महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, दुसरा व चौथा मजला सर्वे नं. ८३२-अ, प्लॉट नं १७८/१७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूट मागे, आगरकर मार्ग, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे-४११००४
दूरध्वनी क्रमांक.०२०-२९७०९६१७/२९७०९३९६ मेल- mscepune@gmail.com. वेबासाईट- mscepune.in

जा.क्र.मरापप/डी.एल.एड मूल्य./२०२५/२९४५ दिनांक :-०२/०५/२०२५

प्रति,

१) प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व

२) शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई, (दक्षिण विभाग)

**विषय :- डी.एल.एड्. परीक्षा जून-२०२५**
**परिरक्षकांची व परिरक्षण ठिकाणांची नावे (शाळा) ऑनलाईनद्वारे कळविणेबाबत.**

डी. एल. एड्. परीक्षा जून-२०२५ ही दि. ०३/०६/२०२५ ते दि. १२/०६/२०२५ या कालावधीत आयोजित केलेली आहे. सदर परीक्षेसाठी आपल्या जिल्हयामध्ये आपण निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रासाठी केंद्रसंचालकांना प्रश्नपत्रिकांचे वितरण करणे, केंद्रसंचालकांकडील उत्तरपत्रिकांचे संकलन करणे व परिषदेच्या सूचनेप्रमाणे उत्तरपत्रिकांचे गठ्ठे करणे इ. कामासाठी परिरक्षक म्हणून जबाबदार व्यक्तीच्या नावाची निवड करुन तसेच परिरक्षक ठिकाणाची नावे निश्चित करुन तातडीने परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या तक्त्यात **दि. ०६ / ०५ /२०२५ पर्यंत ऑनलाईनद्वारे तात्काळ भरावीत.**

**अ) परिरक्षकांची नावे निश्चित करताना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी -**

१. कोणत्याही परिस्थितीत वर्ग-२ (मशिसे-२) पेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची परिरक्षक म्हणून नेमणूक होता कामा नये. तसेच परिरक्षकांची निवड करताना शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याशी सल्लामसलत करुन परिरक्षकाची निवड करावी.

२. परिरक्षक म्हणून शिफारस केलेली व्यक्ती अनुभवी व परिरक्षक म्हणून काम करण्यात सक्षम असावी. प्रस्तावित व्यक्ती यापूर्वी परीक्षा विषयक कामकाजात दोषी टरलेली नसावी. संबंधित व्यक्तींच्या (परीरक्षक) जवळचा नातेवाईक डी.एल.एड्. परीक्षेसाठी परीक्षार्थी नसावा.

**ब) परिरक्षकाचे ठिकाण निवडताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात -**

१. परिरक्षक ठिकाणासाठी इमारतीची निवड करताना शक्यतो डी.टी.एड्. अध्यापक विद्यालयाची निवड करावी.

२. परिरक्षक ठिकाण टरविणे बाबत संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांची/मुख्याध्यापकांची लेखी संमती मिळविण्याची कार्यवाही तातडीने करावी.

३. परिरक्षक ठिकाणासाठी शाळेची व इमारतीची निवड करताना संबंधित प्राचार्यांशी चर्चा करुन निवड करावी. परिरक्षकांची नावे व ठिकाणे एकदा निश्चित केल्यानंतर पुन्हा ऐनवेळी कोणत्याही कारणासाठी त्यात बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये केंद्रसंचालक व परिरक्षक या वेगवेगळ्या व्यक्ती असाव्यात.

**सूचना -**

परिरक्षकांचे नावे व ठिकाणे इ. माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईनद्वारे भरणेसाठीची लिंक व कृतीओघ तक्ता (Flow Chart) परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला आहे.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०४

Scanned with OKEN Scanner

**आपल्या जिल्हयातील परिरक्षक नियुक्तीसाठी कृतीओघ तक्ता (Flow Chart) खालीलप्रमाणे दिलेला आहे.**

deledexam.in या संकेतस्थळावर जाणे.

↓

प्राचार्य, डाएट लॉगीन आय.डी व पासवर्ड टाकावे.

↓

डाएटचे पॅनल ओपन होईल.

↓

पॅनल वरील Custodian Registration वर क्लिक करावे.

↓

परिरक्षकांना जोडण्यात आलेले केंद्राचे ठिकाण व केंद्र क्रमांक आपणास दिसेल त्यापुढे दिसणाऱ्या View या बटणावर क्लिक करावे.

↓

Custodian च्या माहितीचा बॉक्स दिसेल. (उदा. परिरक्षकाचे नाव, पद, कार्यालयाचा पत्ता, बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव व शाखा, IFSC Code No, ई-मेल, मोबाईल क्रमांक इ.) ही माहिती बिनचूक भरावी.

↓

सर्व माहिती भरलेनंतर शेवटी Submit या बटणावर क्लिक करावे.

Scanned with OKEN Scanner